जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे








दैनिक | वर्ष १ | अंक २३२ | बुधवार, १८ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210


## संक्षिप्त

### अंबादास दानवे यांना जीवे मारण्याची धमकी

**पुणे, ता. १७ :** शिवसेना ठाकरे गटाचे नेते व विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना अज्ञाताने शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला. या प्रकरणी खुद्द दानवे यांनी छत्रपती संभाजी नगरातील क्रांती चौक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. अज्ञात व्यक्तीने १५ मार्च रोजी रात्री ०२ वाजता सतत कॉल करून शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद असून कापून टाकूआणि ठोकून काढू असली धमकी दिल्याचे अंबादास दानवे यांनी सांगितले. ११ मार्च ते १४ मार्च रोजी असे दूरध्वनी कॉल आल्याचेही दानवे यांनी तक्रारीत नमूद केले आहे. धमकी देणाऱ्याने कोणतेही कारण सांगितले नाही. असे फोन येत असतात; पण यावेळी ते सलग दोन तीन दिवस आल्याने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. आपण कुठल्याही धमक्यांना घाबरत नाही. नेहमी वावरताना शिवसैनिकांपैकी कोणी ना कोणी बरोबर असते. अशा धमक्यांना भीक घालायचे नसते, हेही माहीत आहे, असे दानवे म्हणाले.

# पुणे जिल्ह्यातील रुग्णालयांकडून औषधांच्या नावाखाली रुग्णांची लूट

## स्वस्त औषधांना नकार; रुग्णालयांचा उघड लुटमार कारभार सुरु

**लोणी काळभोर, ता. १७ :** स्वस्त औषधे बाहेर, महागड्यांची सक्ती आत या धक्कादायक वास्तवामुळे पुणे शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील रुग्णसेवेचा काळा चेहरा समोर येत आहे. राज्यात अनेक औषधांवर ३० ते ५० टक्क्यांपर्यंत सवलत मिळत असताना, अनेक रुग्णालयांकडून रुग्णांना आमच्याच मेडिकलमधून औषधे घ्या अशी सक्ती केली जात असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. शासनाचे नियम धाब्यावर बसवून सुरू असलेल्या या प्रकारामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

रुग्णालयातील अति दक्षता विभागात रुग्ण उपचार घेत असताना नातेवाईकांची अक्षरशः आर्थिक कोंडी होते. किती औषधे वापरली, किती परत झाली याचा कोणताही स्पष्ट हिशोब दिला जात नाही. मात्र हातात दिली जाते ती मोठमोठी औषधांची यादी, ज्यामुळे नातेवाईक पूर्णपणे संभ्रमात पडतात.




जर एखाद्या रुग्णाच्या नातेवाईकांनी ओळखीच्या मेडिकलमधून स्वस्त औषधे आणू का? असा प्रश्न विचारला, तर ती औषधे चालणार नाहीत असे सांगून त्यांना थेट नकार दिला जातो. विशेष म्हणजे, तीच कँमनी आणि तीच औषधे बाहेर उपलब्ध असतानाही रुग्णालय प्रशासन ती स्वीकारण्यास तयार नसते.

जिल्ह्यातील अनेक मेडिकलमध्ये मानक (ब्रँडेड) औषधांवर १० ते १५ टक्के, तर जनरिक (निब्रँड) औषधांवर तब्बल ३० ते ५० टक्के सवलत मिळत असताना, रुग्णालयांकडून मात्र महागडी औषधे घेण्यास भाग पाडले जाते. त्यामुळे उजढ किंव्रा कमिशनच्या नावाखाली हा सगळा प्रकार सुरू असल्याची जोरदार चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

दरम्यान, रुग्णालयात उपचारासाठी येणारे नागरिक बरे होण्यासाठी येतात की आर्थिक लूट सहन करण्यासाठी, असा संतप्त सवाल आता सर्वसामान्यांकडून उपस्थित केला जात आहे. रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असून, या प्रकारामुळे जनमानसात तीव्र रोष निर्माण झाला आहे.

### कारवाई कधी होणार?

अनेक तक्रारी समोर येऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासन नेमके काय करत आहे? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित यंत्रणा मौन बाळगत असल्याने नागरिकांमध्ये रोष वाढत असून तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### पुणे प्राईम न्यूजचे आवाहन

रुग्णांनी तुमच्यावर झालेला अन्याय निःसंकोचपणे मांडावा किंवा व्हिडिओ स्वरूपात पाठवावा. पुणे प्राईम न्यूज तुमचा आवाज बुलंद करेल! संबंधित दवाखान्याचे नाव जाहीर करून प्रकरण प्रकाशझोतात आणले जाईल आणि तुम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले जातील. नाव जाहीर करायचे नसेल, तरीही तुमची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल. पण अन्याय सहन करू नका, असे आवाहन 'दैनिक पुणे प्राईम न्यूज' टीमच्या वतीने करण्यात आले आहे.

त्यामुळे या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

पुणे शहरासह जिल्ह्यातील अनेक रुग्णालयांकडून सर्वसामान्य रुग्णांची सरळसरळ आर्थिक लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप पुढे येत आहे. उपचाराच्या नावाखाली अवाजवी बिल, औषधांवर अतिरिक्त दर आणि रुग्णांच्या असहायतेचा गैरफायदा घेणे असे प्रकार सातत्याने घडत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.



# ब्लॅकबॉक्सवरून रोहित पवारांकडून मंत्र्यांची कोंडी

**मुंबई, ता. १७ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या संदर्भात केंद्रीय नागरी उड्डाण मंत्र्यांनी संसदेत दिलेल्या उत्तरावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. मंत्र्यांनी दिलेले उत्तर हे थातूरमातूर आणि वेळ मारून नेणारे आहे, अशी टीका करत रोहित पवारांनी थेट मंत्र्यांच्या पारदर्शकतेवरच सवाल उपस्थित केले आहेत.

रोहित पवार यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये एक गंभीर विसंगती मांडली आहे. त्यांनी विचारले की, जर बारामती विमान दुर्घटनेतील ब्लॅकबॉक्स सुरक्षित आहे, तर मंत्र्यांनी तो जळाल्याचे का सांगितले? ब्लॅकबॉक्स हा कोणत्याही विमान अपघातातील सर्वात महत्त्वाचा पुरावा असतो. तो सुरक्षित असतानाही जळाल्याची खोटी माहिती का दिली गेली, याचे उत्तर मंत्र्यांनी द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. रोहित पवार यांनी मंत्र्यांवर व्यक्तिगत आणि आर्थिक संबंधांचेही आरोप केले आहेत.

ज्या VSR कंपनीचे विमान अपघातात सापडले, त्या कंपनीच्या मालकाच्या मुलाच्या लग्नात मंत्र्यांनी पाहुणचार घेतला होता. त्यामुळे मंत्री आता त्या मिठाला जागून चौकशीत पारदर्शकता टाळत आहेत का? असा बोचरा सवाल त्यांनी विचारला आहे.

# हडपसर व शेवाळवाडीत झालेल्या दोन अपघातात दोघांचा मृत्यू




**हडपसर, ता. १७ :** पुणे-सोलापूर रस्त्यावर हडपसर गाडीतळ परिसरात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. गौरव राजा सातपुते (वय-३१, रा. रमाईनगरी, नागपूर) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वार तरुणाचे नाव आहे. याबाबत त्यांची आई इंदू राजा सातपुते (वय ५९) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

या प्रकरणी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरवे सातपुते हा कामानिमित्त पुण्यात स्थायिक झाला आहे. मार्च रोजी पहाटे तीनच्या सुमारास तो हडपसर येथील गाडीतळ परिसरातून निघाला होता. त्या वेळी दुचाकीस्वार गौरव सातपुते याला भरधाव वाहनाने धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या सातपुते याचा उपचारांपूर्वीच मृत्यू झाला होता. पोलीस उपनिरीक्षक कोलेवाड तपास करत आहेत.

दुसऱ्या घटनेत पुणे-सोलापूर रस्त्यावर शेवाळवाडी परिसरात दुचाकीवरील सहप्रवासी तरुणाचा वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदित्य बापू देवकर (वय-२१, रा. सोलापूर) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याबाबत त्याचा मित्र अतुल सूर्यकांत म्हस्के (वय-२०, रा. उत्कर्षनगर, जुळे सोलापूर) याने मांजरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार अतुल आणि सहप्रवासी आदित्य हे रविवारी (१५मार्च) पुणे-सोलापूर रस्त्याने निघाले होते. मांजरीतील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रासमोर भरधाव वाहनाने दुचाकीला धडक दिली. अपघातात सहप्रवासी आदित्य हा गंभीर जखमी झाला. दुचाकीस्वार अतुल याला दुखापत झाली. उपचारादरम्यान आदित्य याचा मृत्यू झाला. पोलीस उपनिरीक्षक नवनाथ बिनवडे तपास करत आहेत.

### ट्रकच्या धडकेत कुंजीरवाडी येथील ज्येष्ठ महिलेचा मृत्यू

**लोणी काळभोर, ता. १७ :** पुणे-सोलापूर महामार्गावर रस्ता ओलांडताना ज्येष्ठ महिलेला ट्रकने दिलेल्या धडकेत महिलेचा जागीच मृत्यू झाला. कुंजीरवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत शुक्रवारी (ता. १३) हि घटना घडली. अन्नपूर्णा गुरु (वय -६४, रा. मोरया सोसायटी, कुंजीरवाडी, पुणे-सोलापूर रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठ महिलेचे नाव आहे. याबाबत अन्नपूर्णा यांचा मुलगा अभिजित (वय -३९) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अन्नपूर्णा गुरु या गुरुवारी पुणे-सोलापूर महामार्गाने निघाल्या होत्या. त्या वेळी कुंजीरवाडी परिसरात रस्ता ओंलाडणाऱ्या अन्नपूर्णा यांना भरधाव ट्रकने धडक दिली. अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या.

# देशातील सर्वात लांब १० –पदरी मल्टी–लेयर मार्ग पुण्यात; अमोल कोल्हेंच्या प्रयत्नांना यश

## ५३ किमीचा हायवे थेट JNPT बंदराला जोडणार

**पुणे, ता. १७ :** मुंबई ते पुणे दरम्यान सतत वाढणारी वाहतूक कोंडी आणि औद्योगिक भागांतील ट्रॅफिकचा ताण लक्षात घेऊन राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. शिरूरसाठी स्वतंत्र आणि पर्यायी महामार्ग उभारण्याला तत्त्वतः मंजुरी देण्यात आली असून यामुळे जुन्या मुंबई-पुणे मार्गावरील दबाव कमी होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पाची माहिती शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांनी दिली.

प्रस्तावित महामार्ग उरण-कर्जत-नेरळ-वांद्रे-पाईट-शिरोली-पाबळ-मलठण-शिरूर असा असणार आहे. अनेक वर्षांपासून स्थानिक नागरिक, उद्योग क्षेत्र आणि प्रवाशांकडून या मार्गाची मागणी केली जात होती. अखेर मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने नेरळ-कर्जत-वांद्रे-पाईट-मलठण-शिरूर या पर्यायी मार्गाला हिरवा कँदील दिला आहे.




या प्रकल्पातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे पुणे ते शिरूर दरम्यान सुमारे ५३ किमी लांबीचा १०-पदरी मल्टी-लेयर उन्नत मार्ग उभारण्यात येणार आहे. हा देशातील सर्वात मोठ्या उन्नत मार्गांपैकी एक मानला जात आहे. विशेष म्हणजे हा महामार्ग थेट जेएनपीटी बंदराशी जोडला जाणार असल्याने औद्योगिक आणि लॉजिस्टिक क्षेत्रासाठी ही मोठी संधी ठरणार आहे.

सध्या चाकण, तळेगाव आणि शिक्रापूर या एमआयडीसी परिसरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. ट्रक, कँटेनर आणि प्रवासी वाहनांचा ताण एकाच मार्गावर असल्याने वेळ आणि इंधनाचा मोठा अपव्यय होतो. नवीन मार्गामुळे हा ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल आणि वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल.

या प्रकल्पामुळे केवळ प्रवास सुलभ होणार नाही, तर शिरूर आणि आसपासच्या भागातील उद्योग, व्यापार आणि रोजगारालाही चालना मिळणार आहे. मुंबई, पुणे, नाशिक आणि जेएनपीटी बंदर यांच्यातील कनेक्टिव्हिटी सुधारल्याने संपूर्ण प्रदेशाच्या आर्थिक विकासाला गती मिळण्याची शक्यता आहे.

# धावत्या वंदे भारत एक्स्प्रेसवर दगडफेक करून व्हिडीओ बनवला

## कल्याणमध्ये हुल्लडबाज तरुणाला अटक

**मुंबई, ता. १७ :** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून साईनगर शिर्डीच्या दिशेने जाणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेसवर एका हुल्लडबाजाने दगडफेक केल्याची घटना कल्याण पत्रीपुलाजवळ घडली. दगडफेक करणारा तरुण व्हिडीओ बनवत होता. यामध्ये एक्स्प्रेसच्या चार डब्यांच्या काचा फुटून मोठे नुकसान झाले. घटनेचे गांभीर्य ओळखून रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांनी दगडफेक करणाऱ्या तरुणाला अटक केली. सनी कांबळे असे अटक आरोपीचे नाव आहे.




साईनगर शिर्डी वंदे भारत एक्स्प्रेस कल्याणजवळील पत्रीपुलाजवळ आली असता गाडीच्या काचेवर दगड आदळले अचानक झालेल्या या प्रकारामुळे खिडकीजवळ बसलेले प्रवासी घाबरले. या घटनेमुळे एक्स्प्रेसमध्ये एकच गोंधळ उडाला. फुटलेल्या काचांच्या एक्स्प्रेससोबत हुल्लडबाड तरुण मोबाईलमध्ये सेल्फी काढत होता. यानंतर तो तरुण रेल्वे मार्गातून पळून गेला.

दक्ष प्रवाशांनी याची माहिती रेल्वे नियंत्रण कक्षाला दिली. रेल्वे सुरक्षा बलाचे जवान आणि कल्याण, डोंबिवली लोहमार्ग पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. आरपीएफ पोलिसांनी रेल्वे मार्गाजवळील आजूबाजूचा परिसर पिंजून काढला आणि दगडफेक करणाऱ्या सनीला अटक केली. कल्याण सुरक्षा बल पोलीस ठाण्यात त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. त्याला रेल्वे न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले. आधारवाडी तुरुंगात त्याची रवानगी करण्यात आल्याची माहिती रेल्वे पोलिसांनी दिली.

# थेऊरमध्ये शिवजयंतीचा दिमाखदार सोहळा

## ढोल-ताशांच्या गजरात शिवशाही मिरवणुकीला उत्स्फुर्त प्रतिसाद

**लोणी काळभोर, ता. १७ :** एक गाव, एक शिवजयंती या संकल्पनेतून आयोजित अखिल श्रीक्षेत्र थेऊर शिवजयंती महोत्सव २०२६ (वर्ष ५ वे) अत्यंत उत्साहपूर्ण आणि शिवमय वातावरणात पार पडला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या सोहळ्याला शिवभक्त, माता-भगिनी तसेच लहान-थोर मावळ्यांची मोठी उपस्थिती लाभली.

श्री चिंतामणी मंदिर येथे श्रीक्षेत्र तुळापूरहून आलेल्या शिवज्योतीचे आगमन झाले. त्यानंतर कार्यक्रमस्थळी शिवज्योत स्थापित करून माजी सैनिकांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांची महाआरती करण्यात आली आणि सोहळ्याला सुरुवात झाली. यानंतर नवनाथ, बेल्हेश्वर आणि अष्टविनायक या प्रसिद्ध ढोल पथकांच्या दमदार ढोल-ताशांच्या गजरात शिवशाही मिरवणुकीची सुरुवात झाली. गावभर निघालेल्या या मिरवणुकीला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. मिरवणूक कार्यक्रम स्थळी पोहोचल्यानंतर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर पंढरपूर येथील लेझीम पथकाने नेत्रदीपक सादरीकरण केले, तर मावळ्यांनी शिवकालीन मर्दानी खेळांच्या थरारक कसरती सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमात अंबिका जग्वार साऊंड सिस्टम तसेच व्ही.जे. अण्णा यांच्या लेझर लाईट शोमुळे रंगत आणखी वाढली. ढोल-ताशा आणि डीजेच्या तालावर शिवभक्तांनी जल्लोष करत वातावरण शिवमय केले. समारोपाच्या वेळी थेऊर पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांची आरती करण्यात आली. आयोजकांचे नियोजन, वर्गणीदारांचे योगदान आणि शिवभक्तांचा उत्साह यामुळे हा शिवजयंती सोहळा दिमाखदार आणि संस्मरणीय ठरला.



## संक्षिप्त



### पाकिस्तानचा अफगाणिस्तानवर एअरस्ट्राईक

**पाकिस्तान, ता. १७ :** अफगाणिस्तानमधील काबूलवर पाकिस्तानी हवाई दलाने एअरस्ट्राईक केला आहे. पाकिस्तानकडून रहिवाशी परिसर आणि रुग्णालयांना लक्ष्य करण्यात आले. पाकिस्तानी हवाई दलाने रुग्णालय आमि रहिवाशी भागांवर बॉम्बचा वर्षाव केला. यामध्ये आतापर्यंत जवळपास ४०० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. पाकिस्तानी लष्कराने काबूलमधील पाच वेगवेगळ्या ठिकाणी बॉम्बहल्ला केला. यामध्ये ४०० लोकांचा मृत्यू झाला असून २५० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. काबूलमध्ये सध्या बचावकार्य जोरात सुरू असून, निवासी भाग आणि रुग्णालयाच्या ढिगाऱ्याखालून मृतदेह बाहेर काढण्याचे आणि जिवंत वाचलेल्या लोकांना सुखरूप बाहेर काढण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत. पाकिस्तानी हवाई दलाने वापरलेल्या अत्यंत शक्तिशाली स्फोटकांमुळे, संरक्षण मंत्रालय आणि GDI मुख्यालयाजवळील संपूर्ण आकाश आगीच्या ज्वाळांनी व्यापून गेले होते. तसेच राष्ट्रपती भवनालगतच्या निवासी भागांतूनही आगीचे प्रचंड लोळ उठत होते.



### नाशिकमधील तपोवनाच्या झाडांवर जादुटोणाचा प्रकार

**नाशिक, ता. १७ :** नाशिकमध्ये सध्या चर्चेत असलेल्या तपोवनपरिसरातून एक धक्कादायक प्रकार समोर आलाय. आधीच वृक्षतोडीच्या मुद्द्यावरून तापलेल्या या परिसरात आता अंधश्रद्धेच्या नावाखाली झाडांवर काळी विद्या केल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. या घटनेमुळे पर्यावरणप्रेमींसह नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळलीय. तपोवन परिसरातील झाडांवर एका कुटुंबातील व्यक्तींचे फोटो लावून त्यावर खिळे ठोकलेले आढळले आहेत. काही ठिकाणी या फोटोंना बिब्बे आणि काळ्या बाहुल्याही जोडण्यात आल्या आहेत. हा प्रकार जादूटोणा किंवा काळी विद्या करण्याच्या उद्देशाने करण्यात आल्याचा दावा पर्यावरणप्रेमींकडून करण्यात येत आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तपोवन परिसर आधीच संवेदनशील बनला आहे. झाडांच्या तोडीविरोधात आंदोलन सुरू असतानाच अशा प्रकारची घटना घडल्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

# कर थकबाकी असतानाही ‘कोरा’ दाखला दिल्याचे चौकशीत उघड

## टिळेकरवाडी ग्रामपंचायत सदस्याच्या अडचणीत वाढ?;

**उरुळी कांचन, ता. १७ :** टिळेकरवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायतीच्या विद्यमान ग्रामपंचायत सदस्यांच्या मिळकतीवर कराची थकबाकी असतानाही, तत्कालीन ग्रामसेवकाने ‘थकबाकी नसल्याचा’ खोटा दाखला दिल्याचा धक्कादायक प्रकार चौकशी अहवालातून समोर आला आहे. या प्रकरणी विस्तार अधिकाऱ्यांनी आपला वस्तुस्थितीदर्शक अहवाल गटविकास अधिकाऱ्यांकडे सादर केल्याने, संबंधित सदस्याचे पद धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



अतुल राजेंद्र टिळेकर यांनी याबाबत दिलेल्या तक्रारीनुसार, ग्रामपंचायत सदस्या कल्पना श्रीकांत टिळेकर यांच्या कुटुंबियांच्या नावावर असलेल्या मिळकतींचा कर थकीत असतानाही त्यांनी निवडणूक किंवा इतर कारणासाठी खोटी माहिती दिल्याचा आरोप करण्यात आला होता. या तक्रारीनंतर पंचायत समिती हवेलीच्या विस्तार अधिकाऱ्यांनी (पंचायत) सखोल चौकशी केली असता, कागदपत्रांमध्ये मोठी तफावत आढळून आली आहे.

अहवालात नमूद केल्यानुसार, सन २०२२-२३ या वर्षात खालील मिळकतींवर थकबाकी दिसून आली आहे. मिळकत क्र १६५ या मिळकतीवर १ हजार ४९८ रुपये थकबाकी होती. तर मिळकत क्र. १६६ या मिळकतीवर ७ हजार ४७२ रुपये थकबाकी होती. मात्र ज्या दिवशी (०७/०७/२०२२) तत्कालीन ग्रामसेवकाने थकबाकी नसल्याचा दाखला दिला, त्या दिवशी प्रत्यक्षात दप्तरी थकबाकीची नोंद होती. कर मागणी नोंदवही नमुना नं. ९ मध्ये थकबाकी दिसत असतानाही, थकबाकी नसल्याचा दाखला कसा दिला गेला? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

यामुळे तत्कालीन ग्राम सेवकाच्या भूमिकेवरही संशय व्यक्त केला जात आहे. विस्तार अधिकाऱ्यांनी हा चौकशी अहवाल पुढील योग्य त्या कारवाईसाठी गटविकास अधिकारी, पंचायत समिती हवेली यांच्याकडे सविनय सादर केला आहे. ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या तरतुदीनुसार, जर एखाद्या सदस्याने स्वतःचा किंवा कुटुंबाचा कर थकवला असेल, तर तो अपात्रतेस पात्र ठरू शकतो. दरम्यान, या अहवालामुळे आता प्रशासन संबंधित सदस्यावर काय कारवाई करणार व खोटा दाखला देणाऱ्या ग्रामसेवकावर फौजदारी दाखल होणार का आणि सदस्याचे पद जाणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> विस्तार अधिकाऱ्यांकडून अहवाल प्राप्त झाला आहे. अहवालानुसार लवकरच पुढील कार्यवाही केली जाणार आहे.
> - **शेखर शेलार,** गटविकास अधिकारी, हवेली

## खडकीत भरधाव वाहनाच्या धडकेत ज्येष्ठाचा मृत्यू

**पुणे, ता. १७ :** जुन्या मुंबई-पुणे रस्त्यावर खडकी रेल्वे स्थानकाच्या समोर भरधाव वाहनाच्या धडकत दुचाकीस्वार ज्येष्ठाचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (ता. १६) सकाळी अकराच्या सुमारास घडली. अपघातात दुचाकीस्वार ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला आहे. याबाबत त्यांचा मुलगा अल्ताफ हनीफ बेलीम (वय ३०, रा. कुमार पिनकॅल सोसायटी, ताडीवाला रस्ता, पुणे स्टेशनजवळ) यांनी खडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

बेलीम यांचे वडील दुचाकीवरुन सोमवारी सकाळी अकराच्या सुमारास जुन्या मुंबई-पुणे रस्त्यावरुन निघाले होते. त्या वेळी भरघाव वाहनाच्या धडक्त त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर पसार झालेल्या वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक सरोदे तपास करत आहेत.

# इंद्रायणीच्या शुद्धीकरणासाठी ५२५ कोटी; उदय सामंत यांची माहिती

**मुंबई, ता. १७ :** सर्वसामान्यांसह वारकरी सांप्रदायासाठी महत्त्वाच्या असलेल्या इंद्रायणी नदीच्या शुद्धीकरणासाठी अमृत योजनेतंर्गत  कोटी रूपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे इंद्रायणी तसेच पवना नदीच्या शुद्धीकरणासाठी व्यापक उपाययोजना करणार असल्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले.



पिंपरी-चिंचवड महानगरातील मेट्रो, नदी सुधार, पर्यटन विकास आदी मुद्यांवर भाजपच्या आमदार उमा खापरे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी इंद्रायणी नदीतील वाढत चाललेल्या प्रदूषणाकडे सरकारचे लक्ष वेधले.


पीएमआरडीएच्या माध्यमातून नदी प्रदूषण रोखण्यासाठी विविध शुद्धीकरण प्रकल्प (ट्रीटमेंट प्लांट) उभारले जात आहेत. परंतु स्थानिकांच्या म्हणण्यानुसार अनेक उद्योगांमध्ये प्रदूषित पाणी शुद्ध करण्यासाठीचे प्लांट पूर्ण क्षमतेने चालवले जात नाहीत, तसेच काही ठिकाणी संध्याकाळच्या वेळी हे प्लांट बंद केले जातात, अशी तक्रार आहे. या संदर्भात सर्व उद्योगांनी प्रदूषित पाण्याचे योग्य शुद्धीकरण करूनच ते नदीमध्ये सोडावे, यासाठी शासनाने काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, असे निर्देश डॉ. गोऱ्हे यांनी दिले.

इंद्रायणी नदी स्वच्छता आणि शुद्धीकरणासाठी अमृत योजनेंतर्गत सुमारे ५२५ कोटी रुपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. या प्रकल्पाच्या निधीमध्ये केंद्र शासनाचा २५ टक्के, राज्य शासनाचा २५ टक्के आणि महानगरपालिकेचा ५० टक्के असा वाटा आहे. या निधीतून नदी स्वच्छता, सांडपाणी प्रक्रिया आणि प्रदूषण नियंत्रणाशी संबंधित विविध कामे हाती घेण्यात येणार आहेत. या प्रकल्पांमुळे इंद्रायणी नदीत सोडले जाणारे सांडपाणी रोखणे, शुद्धीकरण प्रकल्प उभारणे तसेच नदीचे प्रदूषण कमी करणे यासाठी मोठी मदत होणार असल्याचे सामंत म्हणाले.

वारकरी संप्रदायासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली इंद्रायणी नदी स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनाकडून विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. याशिवाय पवना नदीच्या शुद्धीकरणासाठीही स्वतंत्रपणे उपाययोजना करण्यात येतील. या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी, संबंधित विभाग आणि प्रशासन यांच्यासोबत समन्वय साधून पुढील कार्यवाही केली जाणार आहे, असेही सामंत यांनी सांगितले.

## ‘शिवालिक’ नंतर ‘नंदा देवी’ भारतात पोहोचणार

**नवी दिल्ली, ता. १७ :** देशातील वाढत्या एलपीजी संकटाच्या पार्श्वभूमीवर काहीसा दिलासा मिळाला आहे. इराण सरकारकडून विशेष परवानगी मिळाल्यानंतर भारतीय जहाजांच्या मार्गाला मंजुरी मिळालीय. सोमवारी, एलपीजीने भरलेले शिवालिक हे जहाज गुजरातमधील मुंद्रा बंदरात दाखल झाले, तर आज नंदा देवी आणि कच्चे तेल घेऊन जाणारे जग लाडली हे जहाजही भारतीय किनाऱ्यावर दाखल होणार आहे. गॅस विनाविलंब रिफायनरी डेपोमध्ये पाठवता यावा यासाठी प्रशासनाने कागदपत्रांची पूर्तता आधीच केली होती. पश्चिम आशियातील परिस्थितीवर बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. मध्यपूर्वेतील सध्याच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये अडकलेल्या भारतीय जहाजांसंदर्भात भारताने केलेली राजनैतिक रणनीती यशस्वी ठरली आहे.



इराणने विशेष परवानगी देऊन शिवालिकला उतरण्याची परवानगी दिली, जे जहाज आता मुंद्रा बंदरात आपला माल उतरवत आहे. आज दाखल झालेले नंदा देवी हे एलपीजीने भरलेले दुसरे मोठे जहाज आहे. संयुक्त अरब अमिरातीमधून ८१ हजार टन कच्चे तेल घेऊन येणारे जग लाडली हे जहाजही आज भारतीय बंदरात दाखल होईल. या तीन जहाजांच्या आगमनामुळे देशातील स्वयंपाकाच्या गॅस आणि इंधनाच्या पुरवठ्यात लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

# इंदापुरात २९ गायी-वासरांची सुटका; तीन वासरांचा गुदमरून मृत्यू, दोघांविरुद्ध गुन्हा

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. १७ : पिकअप वाहनातून कत्तलीसाठी अमानुष पद्धतीने नेण्यात येणाऱ्या गायी-वासरांची सुटका करत इंदापूर पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत ३ जर्सी गायी, २६ वासरे आणि चारचाकी वाहन असा एकूण ४ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच, या घटनेत तीन वासरांचा गुदमरून वाहनातच मृत्यू झाल्याचे धक्कादायक समोर आले आहे. या प्रकरणी कमलेश साहेबराव दामोदर आणि आबुजर शहाजादा कुरेशी, दोघेही करमाळा तालुका, जि. सोलापूर येथील रहिवासी, यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत सुरज अविनाश गोसावी (रा. कसबा, इंदापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सोमवार (ता. १६) रोजी इंदापूर शहरातील बाह्यवळण महामार्गावर ते व त्यांचे मित्र उभे असताना दुपारी सुमारे १२:३० वाजता एक बोलेरो पिकअप वेगाने जाताना दिसली. त्यावेळी वाहनातून गोमूत्रासारखे पाणी गळत असल्याचे तसेच लहान गुरांच्या ओरडण्याचा आवाज ऐकू आल्याने संशय आला. त्यानंतर त्यांनी त्या वाहनाचा पाठलाग करून पुणेसोलापूर महामार्गावरील इंदापूर उड्डाणपुलाजवळ ते वाहन अडवले.

वाहनाच्या मागील बाजूची ताडपत्री उघडून पाहणी केली असता, त्यामध्ये ३ जर्सी गायी आणि २९ जर्सी वासरे कत्तलीच्या उद्देशाने कोणतीही चारा-पाण्याची सोय न करता पाय व तोंड बांधून अमानुषपणे कोंबून ठेवलेली आढळली. यानंतर तातडीने ११२ क्रमांकावर संपर्क साधून पोलिसांना माहिती देण्यात आली.


पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहनासह गुरे ताब्यात घेतली. त्यावेळी अंदाजे २ महिन्यांचे ३ वासरे मृत अवस्थेत आढळून आली. या प्रकरणी कमलेश साहेबराव दामोदर (वय २७, रा. देवळाली, ता. करमाळा, जि. सोलापूर) आणि आबुजर शहाजादा कुरेशी (रा. मौलालीचा माळ, ता. करमाळा, जि. सोलापूर) यांच्याविरुद्ध इंदापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत पोलिसांनी ३ जर्सी गायी व २६ वासरे ताब्यात घेऊन त्यांना पुढील पालनपोषणासाठी गोशाळेत दाखल केले आहे. तसेच बोलेरो पिकअप वाहनही जप्त करण्यात आले असून पुढील तपास पोलीस हवालदार माधुरी लडकत करत आहेत.

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ६ नवे बोगदे तासनतास होणारी कोंडी फुटणार

**पुणे, ता. १७ :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाढत्या वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी सहा नवीन बोगदे उभारण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. या प्रकल्पासाठी सुमारे १०४ हेक्टर जमिनीची आवश्यकता असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य सरकारकडे सादर केला आहे. या योजनेमुळे मार्गावरील वाहतुकीची क्षमता वाढणार असून प्रवास अधिक जलद होण्याची अपेक्षा आहे.

सध्या मुंबईपुणे द्रुतगती मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक होत आहे. दररोज सुमारे ७० ते ८० हजार वाहने या मार्गावरून प्रवास करतात. मात्र नवीन बोगदे आणि अतिरिक्त मार्गिका तयार झाल्यानंतर ही संख्या वाढून जवळपास १.५ लाख वाहनांपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे प्रवाशांना होणारा विलंब कमी होईल.



या प्रकल्पांतर्गत खंडाळा येथे १, कामशेत येथे २, भाटण येथे १, आडोशी येथे १ आणि माडप येथे १ असे एकूण ६ बोगदे उभारण्याचे नियोजन आहे. प्रकल्पाला मंजुरी मिळाल्यानंतर भूसंपादन प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

पुणे शहरातील वाहतूक कोंडी ही कायमची समस्या बनली आहे. भविष्यात शहरातील विविध रस्ते प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर बाहेर पडणाऱ्या वाहनांची संख्या आणखी वाढणार आहे. याचा विचार करून द्रुतगती मार्गावरील मार्गिका वाढवण्याचा निर्णय घेतला गेला आहे. सध्या या मार्गावर ६ लेन आहेत आणि त्यात आणखी ४ लेन वाढवण्याचा विचार सुरू आहे.

सणासुदीच्या काळात तसेच सुट्ट्यांच्या दिवशी या मार्गावर मोठी गर्दी होते. अशा वेळी वाहतुकीचा ताण अधिक वाढतो. त्यामुळे द्रुतगती मार्गाची क्षमता वाढवणे आवश्यक मानले जात आहे. तसेच मिसिंग लिंक प्रकल्पांतर्गत सुमारे २० किमी अंतरावर ८ लेनचे काम पूर्ण होणार आहे. या सर्व उपाययोजनांमुळे प्रवास अधिक सोयीस्कर होण्याची अपेक्षा आहे.

# भिगवणमध्ये चहाच्या दरात ५ रुपयांची वाढ; व्यावसायिकांचा दरवाढीचा निर्णय

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. १७ : भिगवण व परिसरातील चहाप्रेमींना आता चहासाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. स्थानिक चहा व्यावसायिकांनी एकत्र येऊन घेतलेल्या निर्णयानुसार, चहाचा दर १० रुपयांवरून वाढवून १५ रुपये करण्यात आला आहे. काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, अनेक हॉटेल्स आणि टपऱ्यांवर याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर चहा बनवण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. चहा पावडर, साखर, दूध तसेच गॅसच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने जुन्या दरात व्यवसाय करणे कठीण होत असल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे. याशिवाय वीज बिल, दुकान भाडे व कामगार खर्च वाढल्याने ही दरवाढ अपरिहार्य ठरल्याचेही त्यांनी सांगितले.




> दुकानात येणाऱ्या ग्राहकांसाठी पूर्वी सहजपणे चहापाणी करण्याची प्रथा होती; मात्र दरवाढ झाल्याने आता त्यात काही प्रमाणात बदल करावा लागणार आहे. वाढलेल्या दरांमुळे हा खर्च व्यावसायिकांसाठी थोडा जड ठरत आहे.
> - **अक्षय वाघ,** (ओम गिफ्ट शॉपी, भिगवण)


दरम्यान, अनेक चहा विक्रेत्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून नवीन दर जाहीर केले आहेत. काही ठिकाणी चहा, कॉफी व दूध १५ रुपये, तर सरगम २५ रुपये दराने विक्री होत असल्याचे दिसून येत आहे.

हाफ चहा किंवा हाफ सरगम उपलब्ध नसल्याच्या सूचनाही काही ठिकाणी देण्यात आल्या आहेत.

# लोणी काळभोर महिला वाहतूक पोलिसाची वाहनचालकाकडे अजब मागणी

**लोणी काळभोर, ता. १७ :** पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी (ता.१६) नेहमी सारखीच धावपळ सुरू होती. सूर्य डोक्यावर आला होता आणि कवडीपाट टोलनाक्याजवळ एक तरुण त्याची जुनी दुचाकी घेऊन कामासाठी निघाला होता. त्याला काय माहितीपुढे त्याच्यासोबत काय घडणार आहे! रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका महिला वाहतूक पोलिसांच्या नजरेत त्याची गाडी पडली. हातवर करून त्याला थांबवण्यात आलं.

गाडी बाजूला लाव आदेश आला. तरुण थोडा घाबरला. गाडीची नंबर प्लेट तुटलेली होती, हे त्याला माहित होतं. तो नम्रपणे म्हणाला, मॅडम, चूक झाली माफ करा. क्षणभर शांतता पसरली पण पुढचं वाक्य ऐकून तो थक्क झाला! दंड वगैरे काही घेत नाही आमच्या मांजरीसाठी दूध घेऊन ये आणि बिस्किटसाठी २०० रुपये दे मग जा! तरुणाला वाटलं, कदाचित तो चुकीचं ऐकत असेल पण नाही आवाज पुन्हा आला. यावेळी अधिक कठोर. पैसे दिल्याशिवाय गाडी सोडणार नाही!



त्या क्षणी त्याच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास नाहीसा झाला. खिशात हात घातला पण फक्त काही सुट्टे पैसे. तो हळू आवाजात म्हणाला, मॅडम, माझ्याकडे पैसे नाहीत मी गरीब आहे पण कायद्याचा आधार देणाऱ्यांनीच त्याची विनंती फेटाळली. घाम फुटला डोळ्यांसमोर काम, घर, जबाबदाऱ्या सगळं तरळू लागलं.

शेवटी त्याने मित्राला फोन केला. मित्राने त्याला पैसे घेण्यासाठी बोलावले. काही वेळात २५० रुपये मिळाले आणि त्याने ती फर्माईश पूर्ण केली. तो निघून गेला पण मनात एकच प्रश्न घेऊन, हा दंड होता का? की कायद्याच्या नावाखाली झालेला सौदा? त्या दिवशी फक्त एक तरुण नाही तर कायद्यावरील विश्वासही थोडा हादरला.

रस्त्यावर उभा असलेला पोलिस गणवेश जो सुरक्षिततेचं प्रतीक असतो तोच काही क्षणांसाठी भीतीचं कारण बनला. आणि आता हा प्रश्न प्रत्येक नागरिकांच्या मनात घुमतोय. जर रक्षण करणारेच सौदा करू लागले तर सामान्य माणसाने न्याय कुणाकडे मागायचा? अशा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. लोणी काळभोर परिसरात वाहतूक पोलिसांच्या कारभाराविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, नियम फक्त सामान्यांसाठीच का? असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे. महिला, विद्यार्थी आणि शेतकरी यांच्या गाड्या अडवून किरकोळ कारणांवरून दंडात्मक कारवाई केली जाते, तर दुसरीकडे अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने मात्र बिनधास्तपणे रस्त्यावर धावताना दिसत आहेत. या दुहेरी धोरणामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ज्यांच्यावर कारवाई व्हायला हवी, त्यांच्याकडे दुर्लक्ष आणि जे नियम पाळतात, त्यांनाच त्रास अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक देत आहेत. दरम्यान, या सर्व प्रकाराची गंभीर दखल घेत नागरिकांचे एक शिष्टमंडळ लवकरच पुणे शहर वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव यांची भेट घेऊन अधिकृत तक्रार करणार असल्याची माहिती समोर आली आहे. वाहतूक पोलिसांचा असा अनागोंदी आणि मनमानी कारभार वारंवार सुरू असतानाही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# लोणी देवकरजवळ अपघात; क्रुझर –ट्रक धडकेत तिघांचा जागीच मृत्यू

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. १७ : पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर इंदापूर तालुक्यातील लोणी देवकर परिसरात क्रुझर जीप आणि ट्रक यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात क्रुझरमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तिघे जण क्रुझर गाडीतून प्रवास करत होते. प्रवासादरम्यान अचानक गाडीचा टायर फुटला. त्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटून गाडी रस्ता दुभाजक ओलांडून समोरून येणाऱ्या ट्रकला धडकली. ही धडक इतकी जोरात होती की क्रुझरमधील तिघांचाही जागीच मृत्यू झाला.



मृतांमध्ये वाहन चालक प्रमोद बाळासो खवळे (वय २८, रा. मदनवाडी, ता. इंदापूर), शशांक कोटिया (वय ३२, रा. गौतमनगर, गिरड, ग्वालियर, मध्य प्रदेश) आणि विजयसिंह राजपूत (वय ३५, रा. त्रिलोकनगर, मध्य प्रदेश) यांचा समावेश आहे. हे तिघेही लोणी देवकर एमआयडीसी परिसरातील एका खासगी कंपनीत काम करत असल्याची माहिती समोर आली आहे.

अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मदतकार्य सुरू करून वाहतूक सुरळीत केली. या अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

# उरुळी कांचन येथे भटक्या व मोकाट कुत्र्यांकडून गायींच्या गोठ्यावर हल्ला

## तीन गायी जखमी, शेतकऱ्यांमध्ये बिबट्यापाठोपाठ कुत्र्यांची दहशत

**उरुळी कांचन, ता. १७ :** उरुळी कांचन परिसरात व गावात भटक्या व मोकाट कुत्र्यांची दहशत वाढली आहे. या भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात उरुळी कांचन (ता. हवेली) येथील गायींच्या गोठ्यावर हल्ला केला आहे. यामध्ये तीन गायी जखमी झाल्या असून एक गंभीर जखमी झाली आहे. या वाढत चाललेल्या मोकाट कुत्र्यांच्या समस्येने पुन्हा एकदा गंभीर रूप धारण केले आहे. यामुळे शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या आदी पाळीव प्राण्यांचे बळी जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये दहशत पसरली आहे.



पंडित महादेव कांचन यांच्या गोठ्यात मागील तीन ते चार दिवसांपासून मोकाट कुत्री जनावरांवर हल्ले करीत आहेत. त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान आहे. तसेच तीन ते चार गायी जखमी झाल्या आहेत. या घटने मुळे पंडित कांचन यांनी मोकाट कुत्र्यांचा ग्रामपंचायत प्रशासन व वनविभागाने बंदोबस्त करावा अशी मागणी केली आहे.

मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे उरुळी कांचन व परिसरात असलेल्या गायींच्या शेळ्या-मेंढ्याचा रातोरात फडशा पाडून मोकाट कुत्री पसार होत आहेत. पुणे-सोलापूर महामार्गाच्या कडेला हॉटेल, चिकन-मटण दुकानदार शिळे अन्नपदार्थ, तसेच सडलेले मांस प्लास्टिकच्या पिशव्यांत भरून फेकत आहेत. त्यामुळे या भागात मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली या वन्यजीवांसाठी टी धोकादायक बनली असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

> मोकाट शिकारी कुत्री कळपाने फिरत आहेत. शेळ्या, मेंढ्या, वासरे यांच्यावरही कुत्रे माणसांसमोर हल्ला करत आहेत. प्रतिकार केला असता ते माणसांवरही हल्ला करीत आहेत. भटक्या कुत्र्यांची नसबंदी करण्यात यावी. तसेच, ही कुत्री पकडून न्यावीत.
> - **शिवप्रसाद कांचन,** शेतकरी, उरुळी कांचन

> याबाबत पुणे महानगर पालिकेला ग्रामपंचायतीतर्फे पत्रव्यवहार केला जाईल. तसेच श्वानपथक बोलावून परिसरातील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त लवकरच केला जाईल.
> - **मिलिंद जगताप,** प्रभारी सरपंच, उरुळी कांचन ता. हवेली

# जामखेडमधील गुंड पहिलवान सागर मोहोळकरचा ससूनमध्ये मृत्यू

**पुणे, ता. १७ :** नीलेश घायवळ टोळीतीस सराइतांकडून करण्यात आलेल्या गोळीबारात गंभीर जखमी झालेला जामखेडमधील गुंड पहिलवान सागर मोहोळकर याचा ससून रुग्णालयात उपचारादरम्यान सोमवारी मृत्यू झाला.

पुण्यातील कोथरूड परिसरात दहशत असलेला गुंड नीलेश घायवळ मूळचा अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेडचा आहे. गुंड सागर मोहोळकर हा सुद्धा जामखेडचा आहे. वैमनस्यातून गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात धाराशिव येथील आंदरूड येथील जत्रेतील कुस्ती स्पर्धेत मोहोळकरने घायवळच्या कानशिलात लगावली होती.

दरम्यान, गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात कोथरूडमध्ये दहशत




माजविण्यासाठी घायवळ टोळीतील गुंडांनी एकावर गोळीबार केला होता. या प्रकरणी घायवळसह साथीदारांविरुद्ध पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई केली होती. घायवळ सध्या युरोपात असून, त्याच्या प्रत्यार्पणासाठी पुणे पोलिसांनी ब्रिटीश उच्चायुक्तांशी पत्रव्यवहार केला होता.

मोहोळकर याच्याविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. दोन आठवड्यांपूर्वी घायवळ टोळीतील सराईतांनी मोहोळकर याच्यावर जामखेडमधील नुराणी कॉलनी परिसरात पिस्तुलातून गोळीबार केला होता. मोहोळकर याच्या शरीरात पाच गोळ्या शिरल्या होत्या. गंभीर जखमी अवस्थेतील मोहोळकर याला ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपाचारादरम्यान त्याचा ससून रूग्णालयात सोमवारी मृत्यू झाला, अशी माहिती बंडगार्डन पोलिसांनी दिली.

## इन्स्टाग्राम चॅट्सची प्रायव्हसी संपणार, मेटाने घेतला निर्णय

**मुंबई, ता. १७ :** इन्स्टाग्रामच्या प्रायव्हसी पॉलिसीत ८ मेपासून बदल होणार असून युजर्सच्या खासगी चॅटिंगवर त्याचा परिणाम होऊ शकतो. एंड-टू-एंड एक्रिप्शन फीचरबाबत मेटाने मोठा निर्णय घेतला आहे. मेटाच्या फोटो आणि व्हिडीओ शेअरिंग प्लॅटफॉर्मवरील खासगी चॅट यापुढे खासगी राहणार नाहीत, असे कंपनीतर्फे जाहीर करण्यात आले आहे.

युजर्सच्या प्रायव्हसीचे संरक्षण करण्यासाठी काही वर्षांपूर्वी मेटाने एंड-टू-एंड एक्रिप्शन फीचर लाँच केले होते. आता इन्स्टाग्रामवर पाठवलेले मेसेज पूर्वीसारखे पूर्णपणे खासगी नसतील. कंपनी आपल्या प्रायव्हसी पॉलिसीमध्ये असा बदल करणार आहे.

# अधिवेशन सोडून एकनाथ शिंदे तातडीने दिल्लीला रवाना

**मुंबई, ता. १७ :** राज्यात अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तातडीने दिल्ली दौऱ्यावर गेल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलंय. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाची भेट घेणार असून, या दौऱ्यात जागावाटप आणि मित्रपक्षांमधील समन्वयावर महत्वाची चर्चा होण्याची शक्यता आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे काल दिल्लीत केंद्रीय अधिवेशनात सहभागी होणाऱ्या शिवसेना खासदारांची तातडीची बैठक घेतली. संसदेत पक्षाची भूमिका नेमकी काय असावी, याबाबत त्यांनी खासदारांना मार्गदर्शन केले. याशिवाय, सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाबाबत सुरू असलेल्या



न्यायालयीन लढाईचा आढावा घेण्यासाठी ते वकिलांची भेट घेणार असल्याचेही कळते.

मुंबईत महत्त्वाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अचानक दिल्लीला रवाना झाल्याने विरोधकांच्या भुवया उंचावल्या आहेत. जागावाटपाचा तिढा सोडवणे आणि मंत्रिमंडळ विस्ताराबाबत चर्चा करणे, हे या दौऱ्याचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे बोलले जात आहे.







Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## घामाच्या दुर्गंधीने त्रस्त आहात? मग करुन बघा हे साधे सोपे उपाय

उन्हाळा सुरू होताच अनेकांना शरीरातून येणाऱ्या घामाच्या दुर्गंधीची समस्या त्रास देऊ लागते. घाम स्वतः दुर्गंधीयुक्त नसतो; मात्र त्वचेवर असलेल्या जीवाणूंशी त्याचा संपर्क आला की वास निर्माण होतो. योग्य स्वच्छता आणि काही साधे घरगुती उपाय केल्यास ही समस्या सहज नियंत्रणात ठेवता येते. घाम शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी येतो. पण जेव्हा त्वचेवर घाम जास्त वेळ राहतो तेव्हा जीवाणू वाढतात आणि त्यामुळे दुर्गंधी निर्माण होते. जास्त घाम येणे, अस्वच्छता, काही अन्नपदार्थ किंवा हार्मोनल बदल यामुळेही ही समस्या वाढू शकते.

घामाची दुर्गंधी टाळण्यासाठी सोपे उपाय

दररोज किमान एकदा साबणाने आंघोळ केल्याने त्वचेवरील जीवाणू कमी होतात. उन्हाळ्यात शक्य असल्यास दिवसातून दोनदा आंघोळ करणे फायदेशीर ठरते.

कॉटनचे सैल कपडे वापरल्यास घाम पटकन सुकतो आणि दुर्गंधी कमी होते. घाम झाल्यानंतर ओले कपडे जास्त वेळ घालणे टाळा.

लिंबाचा रस काखेतील भागावर लावल्यास जीवाणू कमी होतात. तसेच थोडा बेकिंग सोडा लावल्यासही घामाची दुर्गंधी कमी होते.

खूप मसालेदार, लसूण-कांदा किंवा जंक फुड जास्त खाल्ल्यास शरीराचा वास वाढू शकतो. त्यामुळे फळे, भाज्या आणि भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे.

जर स्वच्छता ठेवूनही घामाची दुर्गंधी खूपच तीव्र असेल किंवा खूप जास्त घाम येत असेल, तर त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे योग्य ठरते. थोडी स्वच्छता, योग्य आहार आणि साधे उपाय अवलंबल्यास घामाच्या दुर्गंधीपासून सहज सुटका मिळू शकते आणि दिवसभर ताजेतवाने राहता येते. घामाच्या दुर्घंधीपासून दूर राहण्यासाठी आपण अनेक उपाय करणे हे खूप गरजेचे आहेत. याकरता साध्या सोप्या उपायंनी आपण त्यावर मात करु शकतो.

# धर्मस्वातंत्र्य विधेयकावरून विधानसभेत रात्री उशिरापर्यंत वादळी चर्चा

**मुंबई, ता. १७ :** आमिष, प्रलोभन दाखवून किंवा फसवणूक करून बेकायदेशीरपणे होणाऱ्या धमांतराला आळा घालणारे आणि धमांतर प्रक्रियेला नियमांच्या चौकटीत बसविणाऱ्या महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयकावरून आज विधानसभेत वादळी चर्चा झाली. त्यानंतर रात्री उशिरा विधेयक अखेर बहुमताने मंजूर झाले. त्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधेयक चर्चेसाठी ठेवताना ते कोणत्याही एका धर्माच्या विरोधात नसल्याचे स्पष्ट केले. रात्री राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधेयक मंजुरीसाठी सादर केले. विधानसभेत हे विधेयक बहुमताने मंजूर झाल्यानंतर आता हे विधेयक विधान परिषदेत मांडण्यात येईल.

काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने या विधेयकाला विरोध केला. विधेयकाच्या हेतूवर शंका व्यक्त करताना राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या जितेंद्र आव्हाड यांनी वादग्रस्त विधान केल्याने सभागृहात गदारोळ झाला. सभागृह दहा मिनिटांसाठी तहकूब करावे लागले. या विधानामुळे आव्हाड यांना सभागृहाची माफी मागावी लागली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधेयकाबाबत सरकारची भूमिका स्पष्ट करताना विधेयकाचा उद्देश, विधेयकातील तरतुदींची माहिती दिली. हे विधेयक कोणत्याही एका धर्माच्या विरोधात नाही. विधेयकाच्या तरतुदीनुसार आता सक्तीने आणि



इच्छेविरुद्ध धर्मांतर झाल्याचे आढळून आले तर कठोर कारवाई केली जाणार आहे. या विधेयकात सात ते दहा वर्षांपर्यंत शिक्षा आणि १ ते ५ लाख रुपयांपर्यंतच्या दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. कायद्याचे उल्लंघन करून धर्मांतर केले तर त्यात सामील असलेली व्यक्ती किंवा संस्था शिक्षेस पात्र राहतील. अशा प्रकारचे धर्मांतर हे धर्मांतर मानले जाणार नाही. बेकायदेशीर धर्मांतर करून लग्न झाले असेल तर ते लग्नही मान्य केले जाणार नाही, असे फडणवीस यांनी सांगितले.

बेकायदेशीर धर्मांतराद्वारे केलेला विवाह रद्द असल्याचे घोषित केले जाईल. मात्र, त्यातून जन्माला आलेल्या बालकाला आईचा पूर्वाश्रमीचा धर्मच लागू असेल. मात्र त्या मुलाला त्याच्या वडिलांकडे उत्तराधिकार आणि संपत्तीचा हिस्सा मिळवण्याचा हक्क असेल. तसेच संबंधित आई ही पोटगीसुद्धा मागू शकते. अशा प्रकरणांत बाळाचा ताबा हा आईकडे असेल, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. अन्य बारा राज्यांनी हा कायदा केला आहे. विधेयकात कोणत्याही धर्माचे नाव नाही. या विधेयकाच्या निमित्ताने ज्या प्रकारच्या अफवा पसरवल्या जातात, त्या सगळ्या बाजूला ठेवून संवैधानिक पद्धतीने हा कायदा आणला असून त्याला सभागृहाने पाठिंबा द्यावा, असे आवाहनही फडणवीस यांनी केले.

**आव्हाड यांनी माफी मागितली**


राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जितेंद्र आव्हाड यांनी भूमिका मांडली. तेव्हा त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकासंदर्भात एक वादग्रस्त वक्तव्य केले. त्यावरून सत्ताधारी बाकांवरून तीव्र आक्षेप घेण्यात आला. विधानसभेत यावरून एकच गदारोळ झाला. मंत्री शंभुराज देसाई, दादा भुसे, नितेश राणे यांनी आव्हाड यांच्या या वक्तव्याला तीव्र आक्षेप घेतला. विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आव्हाड यांना याबाबत दिलगिरी व्यक्त करण्याचे निर्देश दिले. आव्हाड यांनी यावर दिलगिरी व्यक्त केली. तसेच आव्हाड यांचे वक्तव्य कामकाजातून काढून टाकण्यात आल्याचेही नार्वेकर यांनी जाहीर केले.

मी तुम्हाला शेवटची संधी देत आहे. यापुढे जर तुम्ही छत्रपती शिवाजी महाराज किंवा अन्य महापुरूषांबाबत असे वक्तव्य केलेत तर मला तुम्हाला निलंबित करावे लागेल, असेही नार्वेकर यांनी आव्हाड यांना म्हटले. आव्हाड यांनी सभागृहाचीदेखील माफी मागितली.

## लोकसभेत निलंबित ८ खासदारांना दिलासा; सर्वानुमते निलंबन रद्द

**नवी दिल्ली, ता. १७ :** लोकसभेत कागद फाडून फेकण्याच्या घटनेनंतर निलंबित करण्यात आलेल्या काँग्रेसच्या सात खासदारांसह एकूण आठ विरोधी खासदारांचे निलंबन अखेर रद्द करण्यात आले आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी यासंदर्भातील प्रस्ताव मांडला असून तो आवाजी मतदानाने मंजूर झाला. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी तत्काळ प्रभावाने निलंबन समाप्त झाल्याची घोषणा केली.

मंगळवारी प्रश्नोत्तराच्या तासानंतर अध्यक्षांनी हा प्रस्ताव मांडण्यास सांगितले. यावेळी काँग्रेस खासदार के सुरेश यांनी निलंबन मागे घेण्याची विनंती करत सभागृह सुरळीत चालवण्याचे आश्वासन दिले.



संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले की, सदन सर्वोच्च आहे. आम्ही नेहमी संवादासाठी तयार आहोत. कोणालाही निलंबित होऊन बाहेर राहावे लागावे, अशी कुणाचीही इच्छा नाही. त्यांनी स्पष्ट केले की, सभागृहात नियमांचे पालन होणे आवश्यक आहे आणि सदस्यांनी शिस्त पाळली पाहिजे.

रिजिजू यांनी विरोधकांकडून स्पष्ट आश्वासन मागितले होते. त्यावर काँग्रेसचे के सुरेश यांनी सभागृहात प्लॅकार्ड आणणार नाही, प्रवेशद्वारावर आंदोलन करणार नाही आणि सभागृह चालवण्यास पूर्ण सहकार्य करू, असे सांगितले. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सर्व पक्षांनी सभागृहाची मर्यादा, प्रतिष्ठा आणि परंपरा जपण्याचे आश्वासन दिल्याचे नमूद केले. तसेच संसद परिसरात फेक फोटो, एआय जनरेटेड फोटो किंवा बॅनर-पोस्टरचा वापर टाळावा, असे आवाहन केले.

यानंतर किरेन रिजिजू यांनी नियम ३७४(२) अंतर्गत निलंबन रद्द करण्याचा प्रस्ताव सभागृहात मांडला. ३ फेब्रुवारी रोजी निलंबित करण्यात आलेल्या आठ खासदारांविरोधातील कारवाई रद्द करण्याचा हा प्रस्ताव ध्वनिमताने मंजूर झाला.

निलंबित खासदारांमध्ये काँग्रेसचे मणिक्कम टागोर, अमरिंदर सिंह राजा वडिंग, गुरजीत सिंह औजला, हिबी ईडन, डीन कुरियाकोस, प्रशांत पडोळे, किरण कुमार रेड्डी तसेच डाव्या पक्षाचे एस. वेंकटेशन यांचा समावेश होता.

या निर्णयामुळे विरोधी पक्षातील खासदारांना मोठा दिलासा मिळाला असून, लोकसभेतील कामकाज सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## अभिषेक शर्मा बनणार सनरायजर्सचा नवा कर्णधार?

**मुंबई, ता. १७ :** आयपीएलच्या १९ व्या पर्वाला २८ मार्चला सुरुवात होणार आहे. आयपीएलच्या २०२६ व्या पर्वाची पहिली मॅच रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्यात होणार आहे. सनरायजर्स हैदरबादला सुरुवातीच्या काही सामन्यांसाठी नवा कर्णधार निवडावा लागणार आहे. हैदराबादचा नियमित कर्णधार पॅट कमिन्स काही सामन्यांमध्ये दुखापतीमुळं खेळू शकणार नाही. यामुळं सनरायजर्स हैदराबादला नवा कर्णधार निवडावा लागणार आहे. सनरायजर्स हैदराबादकडून अभिषेक शर्माला कर्णधारपद सोपवलं जाऊ शकतं.

मीडिया रिपोर्टनुसार सनरायजर्स हैदराबादचा नियमित कर्णधार पॅट कमिन्स आयपीएल २०२६ च्या सुरुवातीच्या सामन्यांमध्ये शकणार नाही. पॅट कमिन्स डिसेंबर २०२५



मध्ये शेस मालिकेत खेळला होता. त्यानंतर दुखापतीनंतर पॅट कमिन्स शेस मालिकेत खेळू शकला नाही. पॅट कमिन्स दुखापतीतून बरा झालेला नाही. त्यामुळं आयपीएलमध्ये सनरायजर्स हैदराबादकडून पॅट कमिन्स सुरुवातीच्या सामन्यात खेळू शकणार नाही. पॅट कमिन्सच्या गैरहजेरीत अभिषेक शर्मा सनरायजर्स हैदराबादचा कर्णधार म्हणून नेतृत्त्व करु शकतो. मात्र, अद्याप सनरायजर्स हैदराबादकडून याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.




## जालन्यात गोडाऊन फोडून ११० सिलिंडर चोरले


**जालना, ता. १७ :** तालुक्यातील रामनगर परिसरात गॅस एजन्सीच्या गोडाऊनमध्ये चक्क गॅस सिलिंडरची मोठी चोरी झाल्याचा प्रकार समोर आला आहे. आनंद भारत गॅस एजन्सीच्या उटवद शिवारातील गोडाऊनचे कुलूप तोडून चोरट्यांनी तब्बल ११० गॅस सिलिंडर लंपास केल्याने खळबळ उडाली आहे. चोरीस गेलेल्या सिलिंडरची अंदाजे किंमत साडेचार लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. विशेष म्हणजे एकीकडे नागरिकांना गॅस टंचाईचा सामना करावा लागत असताना हा प्रकार घडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

या प्रकरणी एजन्सीचे व्यवस्थापक सिद्धार्थ आढाव यांनी मौजपुरी पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलिसांकडून या चोरीचा अधिक तपास सुरू आहे. समोर आलेल्या माहितीनुसार रविवारी गॅस एजन्सी बंद असताना मध्यरात्री ही चोरी झाल्याची शक्यता आहे. सोमवारी हा प्रकार उघडकीस आला. या घटनेत जवळपास ९६ घरगुती सिलेंडर तसेच १२ निळ्या रंगाचे व्यावसायिक सिलेंडर आणि ५ किलोचे दोन व्यवसाय सिलेंडर असे एकूण ११० गॅस सिलेंडर चोरीला गेले आहेत, जवळपास ४ लाख ५१ रुपये किमतीचा हा मुद्देमाल चोरीला गेला असून पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली आहे.

## गॅस सिलेंडरचे वितरण केवळ ओटीपी प्रणालीद्वारेच बंधनकारक : जितेंद्र डुडी

**पुणे, ता. १७ :** घरगुती गॅस ग्राहकांसाठी महत्त्वाचा निर्णय घेत पुणे जिल्ह्यात गॅस सिलेंडर वितरणात मोठा बदल करण्यात आला आहे. आता गॅस सिलेंडरचे वितरण केवळ ओटीपी प्रणालीद्वारेच केले जाणार असून, बुकिंगनंतर ९६ तासांच्या आत सिलेंडर घरपोच देणे बंधनकारक करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तेल कंपन्या आणि गॅस एजन्सी प्रतिनिधींना कडक सूचना देण्यात आल्या. यानुसार, गोदाम, एजन्सी किंवा इतर कोणत्याही ठिकाणावरून थेट सिलेंडर देण्यास पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. यापुढे ग्राहकांना गॅस सिलेंडर



मिळण्यासाठी ओटीपी आवश्यक असणार असून, वितरण केवळ नोंदणीकृत ग्राहकांनाच आणि घरपोच पद्धतीनेच होणार आहे. त्यामुळे गैरव्यवहार, काळाबाजार आणि अनधिकृत विक्रीवर आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सींना त्यांच्या कार्यालयाबाहेर गॅस सिलेंडरचे वितरण फक्त ओटीपी द्वारेच ९६ तासांत घरपोच करण्यात येईल असे स्पष्ट फलक लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सर्व ग्राहकांना SMS द्वारे या नव्या नियमांची माहिती देण्यासही सांगण्यात आले आहे. दरम्यान, नियमानुसार सुरू असलेल्या वितरण प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलिस प्रशासनालाही देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे ग्राहकांना अधिक सुरक्षित आणि पारदर्शक सेवा मिळणार असून, एजन्सीसमोरील गर्दीही कमी होणार आहे.

## हॉटेलसमोर उभी असलेल्या बसमधून दीड लाखांचे सोन्याचे दागिने लंपास

**यवत, ता. १७ :** पुणे-सोलापूर महामार्गावर हॉटेलच्या बाहेर थांबलेल्या बसमधून अज्ञात चोरट्याने तब्बल १ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. बोरीपार्धी (ता. दौंड) गावाच्या हद्दीत धायगुडेवाडी येथील नॅशनल हॉटेलसमोर मंगळवारी (ता. १०) रात्री सव्वा १२ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

याप्रकरणी बालाजी गणपतराव त्रिकोळे (वय ५३, रा. भोसरी, पुणे; मूळ रा. लातूर) यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी बालाजी त्रिकोळे मंगळवारी (ता. १०) रात्री बसने प्रवास करत होते. रात्री सव्वा १२ वाजण्याच्या सुमारास त्यांची बस बोरीपार्धी येथील नॅशनल हॉटेलजवळ थांबली होती. यावेळी अज्ञात चोरट्याने त्रिकोळे यांच्या बॅगेतील लेडीज पर्स चोरी केली.

चोरट्याने पर्समधील ७५ हजार रुपये किमतीचे दीड तोळे वजनाचे सोन्याचे मिनी गंठण, ३५ हजार रुपये किमतीचे ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुमके, तसेच ३० हजार रुपये किमतीची ६ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन असा एकूण १ लाख ४० हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला.

दरम्यान, महामार्गावरील हॉटेल्सवर बस थांबल्यानंतर प्रवासी खाली उतरतात. याच संधीचा फायदा घेत चोरटे बसमध्ये शिरून प्रवाशांच्या बॅगा आणि मौल्यवान वस्तू चोरी करत आहेत. या घटनेमुळे लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रकरणी यवत पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३ (२) नुसार गुन्हा नोंदवला असून, हॉटेल परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीच्या आधारे चोरट्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.




## संजू सॅमसनकडे सोपवली जाणार चेन्नईचे कर्णधारपद?

**पुणे, ता. १७ :** इंडियन प्रीमियर लीगच्या आगामी हंगामापूर्वी क्रिकेट वर्तुळात एक मोठी खळबळ उडाली आहे. आयपीएल इतिहासातील सर्वात मोठा 'ट्रेड' यशस्वी झाला असून, संजू सॅमसन आता चेन्नई सुपर किंग्जच्या 'येलो जर्सी'मध्ये दिसणार आहे. विशेष म्हणजे, चेन्नईने अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाच्या बदल्यात संजूला आपल्या संघात स्थान दिले आहे. या ऐतिहासिक बदलानंतर संजू सॅमसनच चेन्नईचा नवा कर्णधार होणार का? या चर्चेला आता उधाण आले आहे.

महेंद्रसिंह धोनीने कर्णधारपद सोडल्यानंतर ऋतुराज गायकवाडकडे नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली होती. मात्र, गेल्या दोन हंगामात चेन्नईला अपेक्षित यश मिळाले नाही. ऋतुराजच्या नेतृत्वाखाली संघाला प्ले-ऑफपर्यंत पोहोचण्यातही अपयश आले. धोनीचा वारसदार म्हणून एका अनुभवी आणि 'मॅच विनर' खेळाडूची चेन्नईला गरज होती. अशातच संजू सॅमसनसारखा खेळाडू संघात आल्याने चेन्नईची बाजू अधिक भक्कम झाली आहे.

एका सार्वजनिक कार्यक्रमात संजूला चेन्नईच्या कर्णधारपदाबाबत विचारले असता संजू म्हणाला, चेन्नई सुपर किंग्जमध्ये मला 'हेड्स आणि टेल्स' (नाणेफेक) करण्याची गरज नाही. कारण तिथे फक्त एकच 'हेड' आहे आणि ते म्हणजे एमएस धोनी. माझे मुख्य ध्येय टीम मॅनेजमेंट आणि 'माही भाई'ने माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवणे हेच आहे.

# लोणी काळभोर-उरुळी कांचन परिसरात वाहतूक व्यवस्था कोलमडली

## मंगल कार्यालयांचा मनमानी कारभार, पोलीस फक्त दंड वसुलीत गुंतले

**लोणी काळभोर, ता. १७ :** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर शेवाळवाडी ते उरुळी कांचन दरम्यान सध्या वाहतूक कोंडी हा रोजचा प्रश्न बनला असून, याला थेट कारणीभूत ठरत आहेत महामार्गालगत असलेल्या शेकडो मंगल कार्यालयांचा बेजबाबदार कारभार. मात्र या गंभीर समस्येकडे डोळेझाक करत लोणी काळभोर व उरुळी कांचन वाहतूक पोलीस मार्च एंडच्या नावाखाली वाहनधारकांवर दंडाची मोहीम राबवण्यात व्यस्त असल्याचा संतप्त आरोप नागरिक करत आहेत.

शेवाळवाडी येथील स्वजय पॅलेस, आकाश लॉन्स, कदमवाकवस्ती येथील गुलमोहर, मधुबन, काळभोर लॉन्स तसेच कुंजीरवाडी येथील धनश्री लॉन्स ही मंगल कार्यालये महामार्गालगत आहेत. त्यामुळे येथे कार्यक्रम सुरू झाला की पाहुण्यांची वाहनं थेट सर्व्हिस रोडवर, तर कधी मुख्य रस्त्यावरच उभी केली जातात. कोणतेही नियोजन नाही, पार्किंगची सोय नाही आणि वाहतूक नियंत्रणाचा पूर्ण अभाव असल्याने संपूर्ण महामार्ग ठप्प होतो. याचा सर्वाधिक फटका स्थानिक नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि रोजच्या प्रवाशांना बसत असून, तासनतास कोंडीत अडकून मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे.

कदमवाकवस्ती (ता. हवेली) परिसरातील एका मंगल कार्यालयात



सोमवारी (ता. १६) झालेल्या विवाह सोहळ्यामुळे परिस्थिती पूर्णपणे हाताबाहेर गेली. रस्त्यावर बिनधास्त वाहनं पार्क केल्यामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना तब्बल ४ ते ५ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. एक तासाहून अधिक काळ नागरिक अडकून पडले होते. विशेष बाब म्हणजे या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिकाही अडकली होती. जीवन-मरणाच्या प्रसंगी धावणाऱ्या रुग्णवाहिकांनाही मार्ग मिळत नसल्याने प्रशासनाच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मात्र या प्रकरणात ना मंगल कार्यालय व्यवस्थापनाने जबाबदारी घेतली, ना पोलिस प्रशासन प्रभावी कारवाई करताना दिसले.

उरुळी कांचन येथील तळवडी चौकात दररोज संध्याकाळी ७ ते ९ या वेळेत वाहतूक कोंडी होते. मात्र ती सोडवण्यासाठी पोलीस यंत्रणा निष्क्रिय असल्याचे चित्र दिसते. एखाद्या मोठ्या नेत्याचा ताफा जाणार असेल तेव्हाच पोलीस तत्परतेने रस्त्यावर उतरतात. अन्यथा नागरिकांना स्वतःच मार्ग काढावा लागतो, हीच सध्याची वस्तुस्थिती आहे.

एकीकडे मंगल कार्यालयांकडून नियमांचे उल्लंघन होत असताना त्यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई होत नाही. दुसरीकडे सामान्य नागरिकांना मात्र किरकोळ कारणांवरून दंड केला जातो. या दुहेरी धोरणामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे. लोणी काळभोर व उरुळी कांचन वाहतूक पोलीस महामार्गावरील वाहतूक नियंत्रणात अपयशी ठरत आहेत का, की या प्रकाराकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात आहे, असा सवाल नागरिक विचारत आहेत.

दरम्यान, याबाबत अधिक माहिती घेण्यासाठी पुणे शहर वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांनी फोन न उचलल्याने प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

### नायगाव चौक की कोंडीचा चौक?

उरुळी कांचन व लोणी काळभोर वाहतूक पोलिसांच्या हद्दीतील नायगाव चौकात सध्या वाहतूक कोंडी हा नित्याचा प्रश्न बनला आहे. या चौकात दररोज वाहनांची मोठी गर्दी होते; मात्र वाहतूक पोलीस कर्मचारी क्वचितच नियमन करताना दिसतात. अनेक वेळा ते पूर्णपणे अनुपस्थित असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. परिणामी, नायगाव चौक वाहतूक कोंडीचा चौक म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. प्रशासन जागं होणार का, की नागरिकांनीच हा त्रास सहन करायचा, असा सवाल उपस्थित होत आहे.